Estd: 1962
'A++' Accredited
by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ऑफलाईन प्रवेश परीक्षेसाठी परीक्षार्थींसाठी महत्वाच्या सूचना-

- परीक्षार्थींनी स्वतःच्या लॉगीनमधून हॉलतिकीट डाऊनलोड करून त्याची हार्डकॉपी परीक्षेवेळी स्वतःजवळ बाळगावी.
- परीक्षा हॉल तिकीट मधील सर्व तपशील (स्वतःचे नाव, विषयाचे नाव, परीक्षा केंद्र, परीक्षा वेळ इ. अचूक आलेबाबत खातरजमा करावी. काही त्रुटी निदर्शनास आलेस पी.जी.प्रवेश विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ०२३१-२६०९१४२, २६०९३७८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
- परीक्षेवेळी हॉल तिकीट व्यतिरिक्त इतर शासनमान्य ओळखपत्रांपैकी किमान एक ओळखपत्र जवळ बाळगावे. (उदा. आधार कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र)
- परीक्षार्थींनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान ३० मिनिट अगोदर उपस्थित राहावे.
- परीक्षा सुरू झालेनंतर १५ मिनिटानंतर येणा-या परीक्षार्थीस परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही याची परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.
- परीक्षार्थींनी परीक्षेवळी काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे. कोणत्याही परिस्थितीत पेन्सिल, शाईचा पेन, मार्कर इत्यादीचा वापर करू नये.
- परीक्षार्थींना देण्यात येणारी OMR Sheet कार्बन कॉपीसह देण्यात येणार आहेत.
- **परीक्षार्थींनी प्रवेशपत्रावरील (Seat Number) व Subject Code त्यांना देण्यात येणा-या OMR Sheet वर विहीत ठिकाणी अचूकपणे नमूद करावा.**
- परीक्षार्थींनी OMR Sheet वरील Examination, Subject Name, Seat Number, Subject Code, Signature of the Candidate, Day, Date and Time या बाबी काळया शाईच्या बॉलपेनद्वारे अचूकपणे भराव्यात.
- उत्तरासाठी दिलेले वर्तुळ भरतेवेळी OMR Sheet फाटणार नाही तसेच घडी पडणार नाही याबाबत योग्य ती दक्षता परीक्षार्थींनी घ्यावी.

- परीक्षेची वेळ संपलेवर परीक्षार्थींनी OMR Sheet मुखपृष्ठाच्या मागील कार्बन कॉपी (व्दीतीय पान) व्यवस्थित रित्या कट करून स्वतःजवळ ठेवावी व मुळ OMR Sheet (प्रथम पान) सुपरवायझर यांचेकडे जमा करण्यात यावी.
- परीक्षार्थींस परीक्षेवेळी कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण जवळ बाळगता येणार नाही. (उदा. मोबाईल, स्मार्टवॉच इ.)
- परीक्षार्थींनी परीक्षा कालावधीत आपल्या जवळ कोणताही आक्षेपार्ह मजकूर जवळ बाळगू नये. (उदा. चिठ्ठी, कागद इ.)
- परीक्षार्थींस काही कच्चे काम(Rough Work) करावयाचे झाल्यास प्रश्नपत्रिकेच्या शेवटच्या पानावर करावे.
- परीक्षार्थींनी परीक्षा केंद्रावर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ